अहमदपूर तालुक्यातील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास (लातूर जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत ‘भूगोल’ विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्. डी.) पदवीसाठी सादर करावयाचा प्रबंध आराखडा

संशोधक

दोडे रामानंद बालासाहेब

एम. ए. बी.एड्., एम. फिल

मार्गदर्शक

प्रा. डॉ. मुकेश जयकुमार कुलकर्णी

एम.ए. पीएच. डी., नेट

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

संशोधन केंद्र

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

मे -२०१९

अहमदपूर तालुक्यातील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास (लातूर जिल्हा)

प्रस्तावना :-

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक उपशाखा आहे. या शाखेमध्ये लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचा अभ्यास केला जातो. कोणत्याही प्रदेशाची लोकसंख्या ही एक नैसर्गिक साधनसंपत्ती असते. मानव आपल्या बुद्धीकौशल्याच्या जोरावर नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करुन घेत असतो व त्यातून आर्थिक उत्पादने घेत असतो. राष्ट्राच्या आर्थिक उत्पादनाबरोबरच त्या राष्ट्राचे सार्वभौमत्व, संरक्षण व राष्ट्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी लोकसंख्येला महत्वाचे स्थान असते. प्रदेशाच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका असलेल्या लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास मी या संशोधनात करणार आहे.

जगप्रसिद्ध विचारवंतांनी आपल्या लिखाणात लोकसंख्येविषयी उल्लेख केलेला आढळतो. तसेच अठराव्या व एकोणिसाव्या शतकात अनेक तज्ञांनी लोकसंख्याशास्त्राच्या विकासात भर घातलेली आढळते. त्यामुळे लोकसंख्येच्या विस्तृत अध्ययनाकडे अनेक जागतिक विद्वानाचे लक्ष आकर्षित होवून लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणात अध्ययन होवू लागले. असे असले तरी लोकसंख्या भूगोलाला स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून मान्यता मिळाली ते १९५० नंतरच. लोकसंख्या हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्वात महत्वाचा घटक असून सजीव सृष्टीतील इतर घटकांपेक्षा श्रेष्ठ आहे. मानवाकडे असलेली कल्पकता, दूरदृष्टी, बुद्धीमत्ता, सहन करण्याची क्षमता इत्यादी गुणामुळे मानव विविध प्रकारच्या साधनाची निर्मिती उदरनिर्वाहासाठी करुन मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो.

लोकसंख्या भूगोल हे एक असे विज्ञान आहे ज्यात लोकसंख्येचे वितरण, घनता, स्थलांतर, वृद्धी या विधिंचे विश्लेषण होते. (झेलनस्की १९६६), लोकसंख्या भूगोल

लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचे अध्ययन करत असून त्यांचे संबंध प्राकृतिक, सांस्कृतिक व आर्थिक घटकांशी असतात. (क्लार्क १९६५) लोकसंख्या भूगोलाचा संबंध लोकसंख्या ज्या वातावरणामध्ये राहते त्या वातावरणाचा लोकसंख्येवर पडणारा प्रभाव व त्याची वैशिष्ट्ये यांच्याशी आहे. (गार्नियर १९६६) लोकसंख्येचा अभ्यास प्राचीन काळापासून केला जात आहे.

इ.स. १९५३ मध्ये या भौगोलिक अभिकर्त्याचे महत्व लक्षात घेऊन जी. टी. त्रिवार्ता यांनी अमेरिकन भूगोल तज्ञांच्या परिषदेत आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये लोकसंख्या भूगोलास मानवी भूगोलामधील एक स्वतंत्र शाखा म्हणून मान्यता देण्यासंबंधी भूगोल तज्ञांना आवाहन केले. लोकसंख्या भूगोलास भूगोलाची एक महत्वपूर्ण शाखा म्हणून विकसित करण्याचे कार्य सर्वप्रथम त्रिवार्ता यानी केल्यामुळे त्यांना लोकसंख्या भूगोलाचे जनक या नावाने संबोधले जाते. त्यांच्या नंतर लोकसंख्या भूगोलाचा विकास घडवून आणण्यात जे. आय. क्लार्क, झेलन्सकी, बिजू गार्नियर यांनी महत्वपूर्ण कार्य केले.

लोकसंख्येचा अभ्यास हा लोकसंख्येचा आकार, रचना, वितरण, घनता, वृद्धी या घटकांशी संबंधित किंवा मानवी समूह हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील इतर सजीवापेक्षा सर्वश्रेष्ठ असल्याने निसर्गातील एक प्रमुख अभिकर्ता म्हणून मानवाला ओळखले जाते. उपलब्ध साधन संपत्तीचा योग्य वापर करुन प्रदेशाचा विकास करण्यासाठी तेथील लोकसंख्या ही महत्वाची असते. प्रदेशाच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका असलेल्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

विषयाची निवड :-

कोणत्याही प्रदेशाच्या विकासाचा खरा आधारस्तंभ म्हणजे त्या प्रदेशाची

लोकसंख्या होय. भूतकाळातून लोकसंख्येचा ओघ आणि भविष्यकाळातील लोकसंख्येचा वेध यांची सांगड घालण्यासाठी लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास या विषयाची निवड केली आहे. लोकसंख्येचा जैविक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक गुणधर्माचा विस्तृत अभ्यास या विषयात अंतर्भूत आहे. लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांची माहिती करुन घेणे तसेच लोकसंख्याविषयक समस्याची माहिती करुन घेणे व त्या समस्यावर उपाययोजना सुचविणे यासाठी वरील विषयाची निवड केली आहे. अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्या वैशिष्ट्यांचा सखोल व सुक्ष्म अभ्यास करण्यासाठी व त्याचे महत्व लक्षात घेवून विषयाची निवड केली आहे. अहमदपूर तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचे आत्तापर्यंत सुक्ष्म निरीक्षण केले गेले नसल्यामुळे सदर तालुक्याचे महत्व लक्षात घेवून या विषयाची निवड केली आहे. ग्रामीण भागामध्ये शेती हा मुख्य व्यवसाय आढळून येतो. या व्यवसायाचा लोकसंख्येवर पडणारा प्रभाव अभ्यासण्यासाठी या विषयाची निवड केली आहे. इ.स. १९८१, १९९१, २००१ च्या तुलनेत २०११ साली अहमदपूर तालुक्यातील लोकसंख्येत वाढ झाली आहे की घट झाली आहे. याचा अभ्यास करण्यासाठी व त्याची कारणे शोधण्यासाठी अभ्यास विषयाची निवड केली आहे.

अभ्यास क्षेत्र :-

लातूर जिल्ह्यातील अहमदपूर हा तालुका दुस-या क्रमांकाचा मोठा तालुका आहे. हा तालुका नांदेड जिल्ह्याच्या सीमेलगतचा असून लातूर व नांदेड या दोन जिल्ह्यांना जोडणारा तालुका आहे. याचा अक्षयवृत्तीय विस्तार १७° १४' उत्तर ते १८° ७' अक्षवृत्त आहे आणि रेखावृत्तीय विस्तार ७६° ९३' उत्तर ते ७९° ६' रेखावृत्त इतका आहे.

गृहितके :-

१) अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक विविधतेमुळे लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांमध्ये असमानता दिसून येते.

२) अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक घटकांच्या प्रभावामुळे व्यावसायिक रचनेमध्ये असमानता आढळते.

३) अभ्यास क्षेत्रातील सामाजिक व आर्थिक घटकाच्या प्रभावामुळे साक्षरता व लिंगगुणोत्तरामध्ये विषमता पहावयास मिळते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

अहमदपूर तालुक्यातील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा स्थळ व काळ सापेक्ष अभ्यास करणे हा मुख्य उद्देश आहे. या उद्देशपूर्तीसाठी खालील विविध घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१) अहमदपूर तालुक्यातील प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांचा अभ्यास करणे.

२) अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येच्या घनतेचा व वितरनाचा अभ्यास करणे.

३) अभ्यास क्षेत्रातील मंडळनिहाय लिंगगुणोत्तराचा अभ्यास करणे.

४) अभ्यास क्षेत्रातील वयोरचनेचा अभ्यास करणे.

५) अभ्यास क्षेत्रातील साक्षरता व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.

६) अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या प्रेक्षपणाचा अभ्यास करणे.

आधार सामुग्री :-

सदरील संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरुपाची आकडेवारी वापरणार आहे. प्राथमिक स्वरुपाची आकडेवारी प्राप्त करण्यासाठी सर्वेक्षण, प्रश्नावली व मुलाखत यांचा

उपयोग करणार आहे. तर दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीसाठी भारतीय जनगणना पुस्तिका, आर्थिक सामाजिक समालोचन, संशोधन अहवाल, विविध संशोधन पत्रिका, जिल्हा नियोजन अहवाल, लातूर जिल्हा गॅझेटेड आणि सर्वे ऑफ इंडियाचे नकाशे इत्यादीचा वापर करणार आहे. तसेच सेन्सस ऑफ इंडिया १९८१, १९९१, २००१ व २०११ इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

अभ्यास पद्धती :-

सदरील शोध प्रबंध विविध अभ्यास पद्धतीचा उपयोग करुन पूर्ण करण्यात येणार आहे. त्या पद्धती पुढील प्रमाणे आहेत.

१) नकाशा पद्धत :-

सदरील शोधनिबंधात नकाशा पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. विविध प्रकारची माहिती सोयीस्कर पद्धतीने दाखविण्यासाठी नकाशाचा वापर केला जाणार आहे.

२) विश्लेषणात्मक पद्धत :-

ही पद्धत एक महत्वपूर्ण अभ्यास पद्धत आहे. या पद्धतीचाही वापर आपण या पद्धतीचाही वापर या शोधप्रबंधासाठी करणार आहोत.

३) सांख्यिकीय पद्धत :-

सदरील शोधप्रबंधासाठी मिळवण्यात येणा-या प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विवध तक्ते व आलेखाच्या साह्याने सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

४) स्पिअर्मन्स कोइफिशियन्ट ऑफ कोरीलेशन पद्धत :-

लोकसंख्येची घनता व भूरचना तसेच लोकसंख्या व साक्षरता यांचा सहसंबंधकाढण्यासाठी स्पिअर्मन रँक कोइफिशियंट ऑफ कोरीलेशन (Spearmans Rank Coefficient of Correlation) पद्धतीचा वापर करणार आहे. त्यासाठी खाली सूत्राचा वापर करण्यात येतो.

सहसंबंध

$$r = 1 - \frac{6\sum d^2}{n^3 - n}$$

r = सहसंबंध

$\sum d$ = श्रेणी विचलनाची बेरीज

n = एकूण वारंवारीता

एकूण साक्षरता दर्शवण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला जाईल.

एकूण साक्षरता $= \frac{L}{P} \times k$

L = शिक्षित लोकसंख्या

P = एकूण लोकसंख्या

K = १००

पुरुषाची साक्षरता $= \frac{\text{एकूण साक्षर पुरुष}}{\text{एकूण पुरुषाची लोकसंख्या}}$ X १००

स्त्रियांची साक्षरता $= \frac{\text{एकूण साक्षर स्त्री}}{\text{एकूण स्त्रियांची लोकसंख्या}}$ X १००

तसेच तालुक्यातील लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास करण्यासाठी खालील सूत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{प्रदेशाची एकूण लोकसंख्या}}{\text{प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ}}$$

$$\text{कृषी घनता} = \frac{\text{एकूण कृषी कार्यात कार्यरत लोकसंख्या}}{\text{एकूण कृषी योग्य जमीन}}$$

$$\text{पोषण घनता} = \frac{\text{एकूण लोकसंख्या}}{\text{एकूण कृषी योग्य जमीन}}$$

प्रक्षेपीत लोकसंख्या काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$Pn = Po + \frac{n(po - pm)}{m}$$

Pn = प्रक्षेपित लोकसंख्या,

Po = सद्य जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या,

m = दोन जनगणनेमधील कालावधी

n = मागील जनगणना आणि प्रक्षेपित वर्ष यामधील एकूण वर्षांची संख्या

साहित्याचे पुनरावलोकन :-

सदरील शोधनिबंध पूर्णत्वास नेण्यासाठी लोकसंख्या भूगोलात अभ्यास करुन आपले योगदान देणा-या अनेक भूगोल तज्ञांनी या शाखेत संशोधन केलेले आहे. त्यातील कांही अभ्यासकांचा आढावा घेणार आहे. ते पुढील प्रमाणे-

1) **डॉ. युसूफ खान (१९९०)** :-

यांनी महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचा अभ्यास केला आहे. या संशोधन कार्यात त्यांनी लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांपमध्ये विषमता निर्माण करणा-या मुख्य घटकांचा अभ्यास केला आहे. शिवाय लोकसंख्या घनता, वाढ, साक्षरता, लिंगगुणोत्तर, नागरीकरण या मोठ्या प्रमाणात प्रादेशिक भिन्नता आल्याचे निष्कर्ष काढून त्यावर उपाय सुचविलेले आहेत.

2) **डॉ. गाथाडे डी. जी. (१९९९) :-**

यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण लोकसंख्येच्या आकर्षणाचा भौगोलिक अभ्यास केला आहे. यांनी महाराष्ट्रातील विविध प्रदेशानुसार ग्रामीण लोकसंख्येच्या वितरणाचा अभ्यास केला आहे. महाराष्ट्राच्या पश्चिमेकडे जलसिंचन व वाहतुक सुविधा जास्त असणा-या प्रदेशात ग्रामीण लोकसंख्या जास्त प्रमाणात केंद्रित झालेली आहे असा निष्कर्ष काढला.

3) **डॉ. बराडे सी. एस. (२००१)**

यांनी गोवा राज्यातील लोकसंख्या समस्येचा भौगोलिक अभ्यास केला. त्यात त्यानी गोव्यातील लोकसंख्येच्या वितरणावर भौगोलिक घटकांचा कसा प्रभाव पडतो याचा सविस्तर अभ्यास केला आहे. तसेच लोकसंख्येच्या वितरणावर पर्यटन व्यवसायाचा कसा प्रभाव पडतो याचाही अभ्यास केला आहे.

4) **डॉ. भगत आर. बी. व शर्मा सुमित (२००१) :**

यांनी रोहटक शहरातील जन्मदराचा भौगोलिक अभ्यास केला. रोहटक शहरात सर्वसामान्य कुटूंबातील जन्मदर जास्त आणि उच्चभ्रू कुटूंबातील जन्मदर कमी असा संशोधनाचा अंतिम निष्कर्ष काढला.

5) **डॉ. तिवारी रामकुमार (२००१) :**

यांनी झारखंड प्रदेशातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येतील वाढ या विषयावर भौगोलिक अभ्यास केला. यांनी झारखंड प्रदेशातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्या

वाढ, घनता, स्थलांतर, साक्षरता, वयोरचना, लिंगरचना याचा अभ्यास केला.

6) **डॉ. प्रशांती आर. (२००३) :-**

यांनी भारतातील विविध शहरातील लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा भौगोलिक अभ्यास केला. यांनी लोकसंख्या वाढ, लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्या स्थलांतर, लोकसंख्येची घनता, साक्षरता इत्यादी घटकांवर भौगोलिक, आर्थिक, सामाजिक व धार्मिक घटकांचा कसा प्रभाव पडतो याचा सखोल अभ्यास केला आहे.

7) **डॉ. यादव जे. पी. (२००४) :-**

यांनी आपल्या संशोधनात लोकसंख्याविषयक विविध घटकांचा अभ्यास केला. यामध्ये लोकसंख्येची रचना, लोकसंख्येची वाढ, लोकसंख्येची घनता इत्यादी घटकाचा भारतीय लोकसंख्येच्या दृष्टीने अभ्यास केला.

8) **डॉ. उगाडे व्ही. आर. (२००५) :**

यांनी मराठवाड्यातील लोकसंख्या बदलाचा कल जिल्हानिहाय अभ्यासला आहे. या अभ्यासात मराठवाड्याची एकूण भौगोलिक परिस्थिती व त्यानुसार असलेले लोकसंख्येचे वितरण स्पष्ट केले आहे. मराठवाड्यातील लोकसंख्येची घनता, वाढ, जन्म व मृत्यू दर, स्थलांतर, लिंगरचना, वयोरचना, साक्षरता, धर्मनिहाय लोकसंख्या, ग्रामीण व नागरी लोकसंख्या या विविध घटकांचा जिल्हानिहाय अध्ययन केले आहे.

9) **डॉ. दास एम. एम. (२००६) :-**

यांनी भारतातील लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्य उत्पादन या दोन घटकांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. अन्नधान्य उत्पादनाचा लोकसंख्येच्या वाढीवर कसा प्रभाव पडतो याचा अभ्यास केला आहे. तसेच लोकसंख्या वाढीचा प्रभाव अन्नधान्य उत्पादनावर कसा होतो याचाही अभ्यास केला आहे.

10) डॉ. पस्तापूरे बी. एन. (२००८) :-

यांनी नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण वस्त्याचा अभ्यास केला आहे. यामध्ये त्यांनी जिल्ह्यातील विविध गावाच्या लोकसंख्येतील बदलाचा अभ्यास केला आहे. काही गावाच्या लोकसंख्येत वाढ होत आहे तर काही गावाच्या लोकसंख्येत घट होत आहे असे स्पष्ट केले आहे.

11) डॉ. सोनूले यू. बी. (२०१०) :-

यांनी परभणी जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्येच्या विविध घटकांचा स्थळ व काळ सापेक्ष तालुकानिहाय लोकसंख्येच्या वितरणावर भौगोलिक घटकांचा कसा प्रभाव पडतो याचा सविस्तर अभ्यास केला. याशिवाय परभणी जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्या घनतेचे विविध प्रकार, लोकसंख्या वाढ, जन्मदर, मृत्यूदर, स्थलांतर, लिंगगुणोत्तर, वयोरचना, साक्षरतेचे प्रमाण, नागरीकरण व लोकसंख्या प्रक्षेपण इत्यादी लोकसंख्या संबंधित घटकांचा अभ्यास या संशोधनात केलेला आहे.

प्रकरण रचना :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रकरणाची रचना खालीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले :-

संकल्पनात्मक आराखडा

१.१) प्रस्तावना

१.२) लोकसंख्या भूगोलाचा अर्थ व व्याप्ती

१.३) विषयाची निवड

१.४) अभ्यास क्षेत्र

१.५)   संशोधनाची उद्दिष्ट्ये

१.६)   गृहितके

१.७)   माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती

१.८)   साहित्याचे पुनरावलोकन

१.९)   प्रकरण रचना

प्रकरण दुसरे :-

अभ्यास क्षेत्र

२.१) प्रस्तावना

२.२) अहमदपूर तालुक्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.३) स्थान व विस्तार

२.४)भूरचना

२.५)जलप्रणाली

२.६)हवामान

२.७)अरण्ये

२.८)मृदा

२.९) खनिजे

२.१०) वाहतुक व दळणवळण

२.११) आरोग्य सुविधा

२.१२) बाजारपेठ

२.१३) तालुक्यातील पर्यटन स्थळे

२.१४) व्यावसायिक रचना

प्रकरण तिसरे :-

लोकसंख्येची घनता व वितरण

३.१) प्रस्तावना

३.२) लोकसंख्येला प्रभावित करणारे घटक

३.३) लोकसंख्येचे वितरण

३.४)अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे वितरण

३.५)लोकसंख्येची घनता

अ) गणितीय घनता

ब) पोषण घनता

क) ग्रामीण घनता

ड) नागरी घनता

३.६) सहसंबंध गुणक

अ) पर्जन्य व लोकसंख्येची घनता

ब) भूरचना व लोकसंख्येची घनता

क) साक्षरता व लोकसंख्येची घनता

३.७) अहमदपूर तालुक्यातील लोकसंख्येची दशवार्षिक वाढ

प्रकरण चौथे :-

लिंगगुणोत्तर व वयोगट रचना

४.१)प्रस्तावना

४.२)अहमदपूर तालुक्यातील लिंगगुणोत्तर

४.३) अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील लिंगगुणोत्तर

४.४) अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील लिंगगुणोत्तरातील फरक

४.५) अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील लिंगगुणोत्तर

४.६) अहमदपूर तालुक्यातील लिंगगुणोत्तराचा कल

४.७) वयोगट संरचना

४.८) ग्रामीण व शहरी वयोसंरचना

प्रकरण पाचवे :-

साक्षरता आणि व्यावसायिक रचना

५.१) प्रस्तावना

५.२) अहमदपूर तालुक्याची साक्षरता

५.३) अहमदपूर तालुक्यातील स्त्री-पुरुष साक्षरता

५.४) अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण व नागरी साक्षरता

५.५) अहमदपूर तालुक्यातील अनुसूचित जातीमधील साक्षरता

५.६) अहमदपूर तालुक्यातील अनुसूचित जातीतील स्त्री-पुरुष साक्षरतेचे प्रमाण

५.७) अहमदपूर तालुक्यातील अनुसूचित जमातीमधील साक्षरता

५.८) अहमदपूर तालुक्यातील अनुसूचित जमातीतील स्त्री-पुरुष साक्षरतेचे प्रमाण

५.९) अहमदपूर तालुक्यातील व्यावसायिक रचना

५.१०) अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण व नागरी कामगार

प्रकरण सहावे :-

प्रक्षेपित लोकसंख्या

६.१) प्रस्तावना

६.२) अहमदपूर तालुक्यातील प्रक्षेपित लोकसंख्या

६.३) अहमदपूर तालुक्यातील प्रक्षेपित ग्रामीण लोकसंख्या

६.४) अहमदपूर तालुक्यातील प्रक्षेपित नागरी लोकसंख्या

६.५) अहमदपूर तालुक्यातील प्रक्षेपित लोकसंख्येची घनता

६.६) अहमदपूर तालुक्यातील प्रक्षेपित कृषी घनता

६.७) अहमदपूर तालुक्यातील प्रक्षेपित पोषण घनता

प्रकरण सातवे :-

सारांश आणि निष्कर्ष

❖ संदर्भग्रंथ सूची

❖ परिशिष्ट्ये

संदर्भग्रंथ

१) डॉ.कुंभार अर्जून (१९९४) : प्रात्यक्षिक भूगोल, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. घारपूरे विठ्ठल (१९९९) : मानवी भूगोल, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.

३) डॉ. सोनूले यू. बी. (२०११) : मानवी भूगोल, गटागट प्रकाशन, लातूर.

४) डॉ. शेटे शंकरराव, डॉ. फुले, डॉ. शहापूरकर (२००३) : लोकसंख्या भूगोल, अभिजीत पब्लिकेशन, लातूर.

५) Trewartha G.T. (1953) : A case for population geography, Annals, AAG, 43 PP. 71-97.

6) Varma S. D. (1956) : Density and population of Panjab National Geographical journal of India, vol.2, PP. 30-89.

७) Zelinsky W. (1966) : Bibliographic guide to Population Geography, Chicago University Press Chicago.

८) Clarke J. I. (1966) : Population Geography pergman press, Oxford.

९) Demko G.T. (1970) : Population Geography reader M. C. Raw hill Newyork.

10) Deshpande C.D. (1971) : Geography of Maharashtra National Book Trust Publication, New Delhi.

11) Ugade V. R. (2005) : An Analysis of population Trends in Marathwada : Ph.D. Thesis, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

12) Dr. Sonule, U.D. (2010) : Spatio Tempral changes in demographic Attributes a study of Parbhani District : Ph.D. Thesis, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

संशोधक विद्यार्थी
दोडे रामानंद बालासाहेब
एम.ए.बी.एड्. एम. फील

मार्गदर्शक
प्रा.डॉ. मुकेश जयकुमार कुलकर्णी
एम. ए. पीएच. डी., नेट
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर